**महाराष्ट्र दुकाने व आस्थापना अधिनियम, १९४८ अंतर्गतच्या नियम, १९६१ मधील आस्थापनेची नोंदणी दाखल्याचे नुतणीकरण एक दिवसात देण्यासंदर्भात अंमलबजावणी करणेबाबतची कार्यपध्दती.**

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन शुद्धीपत्रक क्र. एमएसए-११/२०१४/प्र.क्र.२७१/काम-१०,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २७ /१०/२०१७.

वाचा:- १. शासन निर्णय, उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रमांक-एमएसए-११/२०१४/प्र.क्र.२७१/काम-१०, दिनांक २८.०६.२०१७.
२. शासन शुध्दीपत्रक उद्योग, उर्जा व कामगार विभाग क्रमांक-एमएसए-११/२०१४/प्र.क्र.२७१/काम-१०, दिनांक २५.१०.२०१७.

**शुद्धीपत्रक :-**

उपरोक्त शासन शुध्दीपत्रक दिनांक २५.१०.२०१७ मधील परिच्छेद-२ खालील प्रमाणे सुधारित करण्यात येत आहे.

उक्त दिनांक २८.०६.२०१७ च्या शासन निर्णयातील (क) येथे नमूद परिच्छेदासंदर्भात खुलासा करण्यात येत आहे कि, जे अर्ज विहित शुल्कासह व आवश्यक त्या अभिलेखांसह सर्व बाबतीत परिपूर्ण आहेत असे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाल्यापासून एक दिवसाच्या कालावधीत संबंधित आस्थापनेचे निरीक्षण न करता मंजूर करण्यात यावेत. तसेच तद्नंतर आवश्यकता वाटल्यास मंजूरी दिल्यापासुन ३० दिवसाच्या कालावधीमध्ये सदर आस्थापनेचे निरीक्षण करुन व कागदपत्राची पडताळणी करुन अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(सं.क.गुप्ते)
अवर सचिव

प्रत:-

१. मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
२. मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
३. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहायक.
४. कामगार आयुक्त, मुंबई
५. आयुक्त, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
६. मुख्य दुकाने निरिक्षक, बृहन्मुंबई महानगरपालिका, मुंबई.
७. कामगार आयुक्त, मुंबई यांच्याद्वारे सर्व क्षेत्रिय कार्यालयांना अग्रेषित.
८. निवडनस्ती.